स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो/२०२३-२४/४९३** **दि. १२/१२/२०२३**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**फक्त पुणे व पिंपरी चिंचवड शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : शांतता, पुणेकर वाचत आहेत उपक्रमामध्ये सहभागी होणेबाबत...**

महोदय,

महाराष्ट्राची सांस्कतिक राजधानी अशी पुणे शहराची ओळख आहे. विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुण्याची आता जगभरात 'ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट' अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. उद्योग, व्यापार, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, संरक्षण अशा विविध क्षेत्रांत पुणे शहराने आघाडी घेतली आहे. एकंदरीत वाचन संस्कृती जोपासण्यासाठी अनुकूलता असणारे देशातील आघाडीचे शहर म्हणजे पुणे असे म्हणायला वाव आहे.

शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, नॅशनल बुक स्ट, पुणे महानगर पालिका आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ ते २४ डिसेंबर २०२३ या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव' आयोजीत करण्यात आला आहे. पुस्तक प्रदर्शनाबरोबर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, साहित्यकांच्या मुलाखती, सृजनशिलतेला वाव देणारे आणि वाचन संस्कृतीचा विकास घडविणाऱ्या कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

वरील उपक्रमांतर्गत 'शांतता, पुणेकर वाचत आहेत' हा नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. गुरूवार, दि. १४ डिसेंबर २०२३ रोजी, दुपारी १२ ते १ या वेळेत आपण जिथे असाल तिथे एक तास आपल्या आवडीच्या पुस्तकांचे वाचन करावयाचे आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत-जास्त व्यक्तींना सदर उपक्रमामध्ये सहभागी होण्याबाबत आवाहन करून पुढील लिंकद्वारे त्यांची नावनोंदणी करण्यात यावी. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

***सहभागी होण्यासाठी पुढील सूचनांचे पालन करावे.***
**शांतता, पुणेकर वाचत आहेत, गुरूवार, दि. १४ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी १२ ते १ (जिथे आहे तिथे)**

- सदर उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता जास्तीत जास्त व्यक्तींना सहभागी करून घेण्यात यावे
- संस्थेची नावनोंदणी लिंक : https://forms.gle/VmufAnxJBQXt4zHZ6
- वैयक्तिक नावनोंदणी लिंक : https://pbf23.in/register
- पुणे पुस्तक महोत्सव : फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे, दिनांक : १६ ते २४ डिसेंबर, २०२३, स. ११ ते रा. ८
- अधिक माहितीकरिता संपर्क : प्राचार्य डॉ. संजय चाकणे : ७०२०६७४५४५, ९८९०१७१८५७